
24



# माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये माहिती मिळविण्याबाबतच्या अर्जाचा नमुना जोडपत्र – "अ"

E-3531719

प्रति,

मा. जनमाहिती अधिकारी,

नगरसचिव, मिरा भाईंदर महानगरपालिका

| | | |
|---|---|---|
| अर्जदाराचे पूर्ण नांव | : | श्री. एस. आर. तिवारी<br>(संपादक : बजरंग प्रहार साप्ताहिक वर्तमान पत्र)<br>मो.क्र. ९९२०९३६६२५ / ९३२३९८९५५५ / ७०२१९२४७००<br>email. : bajrangprahar24@gmail.com |
| अर्जदाराचा पूर्ण पत्ता | : | फ्लॅट नं. २०७, बालाजी हाईट्स, इंद्रलोक फेस–२, भाईंदर (पूर्व)<br>ता. जि. ठाणे–४०११०५ |
| माहितीचा विषय | : | आरक्षण क्र. ३०२ हॉस्पीटल रिजर्वेशन संबंधित माहिती मिळणेबाबत... |
| माहितीशी संबंधित कालावधी | : | – |
| आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन | : | आरक्षण क्र. ३०२ हॉस्पीटल रिजर्वेशन संबंधित महासभेचा ठराव व प्रशासकीय ठराव देण्यात यावा. |
| माहिती टपालाने अथवा स्वहस्ते | : | माहिती व्यक्तिश: घेऊन जाणार |
| ज्यासाठी माहिती आवश्यक आहे ते प्रयोजन | : | न्यायालयीन कामकाजासाठी |
| अर्जदार दारिद्र्य रेषेखालील आहे किंवा नाही | : | नाही |

ठिकाण : भाईंदर (प.)

दिनांक : १८/१२/२०२४

अर्जदाराची सही

(एस.आर. तिवारी)

प्रोच्च 18/12/24

आवक लिपीक

मिरा - भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
**स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय**
**छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401101**
**सचिव विभाग**
ईमेल - www.nagarsachiv.mbmc@gmail.com


जा.क्र.मनपा/सचिव/मा.अ./२५ /2024 दि.१८/१२ /2024.

**प्रति,**
**श्री. एस.आर.तिवारी,**
**संपादक - बजरंग प्रहार साप्ताहिक वर्तमान पत्र**
**फ्लॅट नं. 207, बालाजी हाईट्स,**
**इंद्रलोक फेस-2, भाईंदर (पूर्व).**

**विषय :-** **केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार 2005.**
**आरक्षण क्र. 302 हॉस्पीटल रिजर्वेशन संबंधित माहिती मिळणेबाबत.**

**संदर्भ :-** **आपणांकडील ई-ऑफीस क्र. (E-3531719) दि. 18/12/2024 रोजीचा ऑनलाईन अर्ज.**

महोदय,

उपरोक्त विषयांकित संदर्भित पत्रान्वये आपण आरक्षण क्र. 302 हॉस्पीटल रिजर्वेशन संबंधित प्रशासकीय ठरावाची मागणी केलेली आहे.

त्या अनुषंगाने आपणांस मा. महासभा दि. 18/01/2016 प्रकरण क्र. 140, ठराव क्र. 107 व प्रशासकीय सभा दि. 13/10/2024 प्रकरण क्र. 63, ठराव क्र. 62 या पत्रासोबत जोडून देत आहोत.

सदर माहितीबाबत आपले समाधान न झाल्यास अपिलीय अधिकारी तथा नगरसचिव श्री. वासुदेव शिरवळकर, सचिव विभाग, तिसरा मजला, मुख्य कार्यालय, स्व. इंदिरा गांधी भवन, भाईंदर (प.) यांचेकडे 30 दिवसात प्रथम अपिल करता येईल.

कळावे.

**(दिनेश कानगुडे)**
**जनमाहिती अधिकारी तथा उपसचिव**
**सचिव विभाग**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

18-12-24

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा.महासभा दि.१८/०१/२०१६

प्रकरण क्र. (१४०) :- मिरा भाईंदर शहरातील आरक्षण क्र. ३०२ (म्युनिसिपल हॉस्पिटल ) विकसीत करणेबाबत व चालविणेबाबतचा प्रस्ताव राज्य शासनास पाठविणेबाबत.

ठराव क्र. :- १०७

मिरा भाईंदर शहराच्या मंजूर विकास योजनेमध्ये मौजे नवघर, स.क्र. (जुना) ४५२पै., ३९२पै., ३९०पै., ३९१पै., ३९३पै. (नविन) १५२पै., १५३पै., १५४पै., १६१पै., १६२पै. या जागेमध्ये आ.क्र. ३०२ (म्युनिसिपल हॉस्पिटल ) हे आरक्षण दर्शविलेले असून मंजूर विकास योजनेप्रमाणे सदर आरक्षणाचे एकुण क्षेत्र १३६०० चौ.मी. आहे. यापैकी महानगरपालिकेच्या ताब्यातील क्षेत्र ९५०.०३ चौ.मी. असून उर्वरीत क्षेत्र खाजगी मालकीचे आहे.

सदरचे आरक्षण समावेशक आरक्षणाच्या तरतुदी अन्वये जागामालकास विकसीत करणेसाठी यापुर्वी जा.क्र. मनपा/नर/८६०/२००७-०८, दि.११/०६/२००७ अन्वये रेखांकन नकाशे मंजूरीसह अकृषिक परवानगी प्राप्त करण्यासाठी नाहरकत दाखला दिलेला असून सदरच्या परवानगीसाठी दि.१७/१०/२००८ रोजी १ वर्षाची मुदतवाढ दिलेली आहे. सदरच्या परवानगीची मुदत संपलेली असून परवानगी व्यपगत झालेली आहे.

मिरा भाईंदर शहरासाठीच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीप्रमाणे आरक्षणाच्या क्षेत्राच्या २५% प्रमाणेचे बांधीव क्षेत्र महानगरपालिकेस हस्तांतरीत करणेच्या अटीवर जागामालक / अधिकारपत्रधारक आरक्षणाचा विकास करु शकतो.

तसेच विकास योजनेमधील आरक्षणे समावेशक आरक्षणाच्या माध्यमातून विकास योजनेची अंमलबजावणी संदर्भात नविन विनियम अंतर्भुत करण्यासाठी शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार दि.३०/०४/२०१५ अन्वये प्रस्तावित केलेले असून त्याप्रमाणे आ.क्र. ३०२ (म्युनिसिपल हॉस्पिटल ) या आरक्षणाच्या क्षेत्रापैकी ५०% प्रमाणेचे बांधीव क्षेत्र जागामालकांनी महानगरपालिकेस हस्तांतरीत करणे आवश्यक आहे तथापि सदरचे फेरबदल अद्याप मंजूर झालेले नाहीत.

वरील दोन्ही प्रभाणे पैकी जागामालक / अधिकारपत्रधारक यांनी महानगरपालिकेस बांधीव क्षेत्र महानगरपालिकेस हस्तांतरित केल्यास महानगरपालिकेस फक्त बांधीव इमारत मिळणार आहे. त्यानंतर सदर इमारतीमध्ये अंतर्गत सजावटीसह यंत्र सामुग्री व अधिकारी, कर्मचारी वर्ग लागणार असून त्यासाठीचा खर्च महानगरपालिकेस परवडणारा नाही.

यास्तव आ.क्र.३०२ (म्युनिसीपल हॉस्पिटल) या आरक्षणाने बाधीत जागा महानगरपालिकेने ताब्यात घेऊन त्या जागेवर शासनामार्फत हॉस्पिटल बांधून चालविण्यासाठीचा प्रस्ताव शासनास सादर करणेस व सदर आरक्षण क्र. ३०२ (म्युनिसीपल हॉस्पिटल) या जागेत बांधण्यात आलेल्या वास्तुस स्व. श्री. धर्मवीर आनंद दिघे असे नाव देण्यात येत आहे.

मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेने भारतरत्न पंडित भीमसेन जोशी रुग्णालय हे टप्पाटप्प्याने चालू करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार सद्यस्थितीत रुग्णालयातील १०० खाटा कार्यान्वित करण्यात आल्या आहेत. उर्वरित १०० खाटा मार्च २०१८ पर्यंत कार्यान्वित करावयाच्या आहेत. सदर रुग्णालयाच्या बांधकामापोटी आजपर्यंत रु. १८.३६ कोटी खर्च झाला असून उपकरणे व साहित्य यासाठी रु. ५.४० कोटी खर्च झाला आहे. सदर २०० खाटांचे रुग्णालय चालविण्यासाठी महानगरपालिकेस वार्षिक अंदाजे रु. २०-२५ कोटी खर्च अपेक्षित आहे. सद्यस्थितीत स्थानिक संस्था कर बंद झाल्याने महानगरपालिकेची आर्थिक स्थिती नाजूक आहे. तसेच रुग्णालयासाठी आवश्यक तज्ज्ञांची पदे तीन वेळा जाहिरात देऊन, भरती प्रक्रिया राबवूनही महानगरपालिकेस मिळालेली

माहिती अधिकार २००५ अंतर्गत
देण्यात आलेली माहिती सत्यप्रत
जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

नाहीत. त्यामुळे वैद्यकीय तज्ज्ञांच्या अभावी रुग्णालय सुरळीतपणे चालविणे शक्य होणार नाही व नागरिकांना दर्जेदार वैद्यकीय सुविधा मिळणार नाहीत.

सदर रुग्णालयाच्या उद्‌घाटन प्रसंगी राज्याचे सन्मा. आरोग्यमंत्री डॉ. दिपक सावंत यांनी, राज्याच्या विधी मंडळात शासनाने दिलेल्या आश्वासनानुसार, महानगरपालिकेचे हे रुग्णालय उप-जिल्हा रुग्णालयाचा दर्जा देऊन शासनामार्फत चालविले जाईल, असे आश्वासन दिले आहे. तसेच राज्याचे सन्मा. वित्त आणि नियोजन, वने मंत्री, श्री. सुधीर मुनगंटीवार यांनीही सदर उद्‌घाटन प्रसंगी रुग्णालय चालविण्यासाठी आवश्यक निधीची शासन तरतूद करेल असे आश्वासन दिले आहे.

महानगरपालिकेच्या नाजूक आर्थिक स्थिती लक्षात घेता, तसेच महानगरपालिकेतील इतर पायाभूत सुविधा विकसित करण्यासाठी शासन विविध योजना व अनुदानांच्या स्वरुपात मदत करत आहे, ही वस्तुस्थिती पाहता, सदर रुग्णालय चालविण्यासाठीही शासनाकडून मदत घेणे आवश्यक आहे.

सबब, मिरा भाईंदर महानगरपालिकेचे भारतरत्न पंडित भीमसेन जोशी रुग्णालय पूर्ण क्षमतेने व सुरळीतपणे चालविण्यासाठी शासनाकडून प्रतिनियुक्तिने वैद्यकीय तज्ज्ञ, तंत्रज्ञ, उपकरणे, साहित्य व औषधे तसेच आर्थिक मदत या स्वरूपात मदत मागण्यासाठी शासनाकडे विनंती प्रस्ताव पाठविण्यास व शासनाच्या निर्णयाप्रमाणे उचित कार्यवाही करण्यास ही महासभा मंजुरी देत आहे.

सुचक :- श्री. नरेंद्र मेहता                    अनुमोदक :- श्रीम. निलम ढवण

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता नरेंद्र लालचंद | १ | कॅटलीन ॲन्थोनी परेरा | निरंक |
| २ | शरद केशव पाटील | २ | ध्रुवकिशोर पाटील | |
| ३ | म्हात्रे कल्पना महेश | ३ | डिमेलो बर्नड अल्बर्ट | |
| ४ | भानुशाली वर्षा गिरधर | ४ | ग्रिटा स्टिफन फॅरो | |
| ५ | मिरादेवी रामलाल यादव | ५ | असेन्ला मेन्डोंसा परेरा | |
| ६ | कोठारी सुमन रमेश | ६ | शिल्पा भावसार | |
| ७ | डॉ. नयना मनोज वसाणी | ७ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | |
| ८ | सिमा कमलेश शहा | ८ | रॉड्रीक्स बाबरा डॉनल्ड | |
| ९ | जैन गिता भरत | ९ | दक्षता राजेंद्र ठाकूर | |
| १० | अरोरा दिपीका पंकज | १० | पाटील वंदना विकास | |
| ११ | रावल भगवती जयशंकर | ११ | शबनम लियाकत शेख | |
| १२ | मेहता डिंपल विनोद | १२ | प्रभात प्रकाश पाटील | |
| १३ | मेघना दिपक रावल | १३ | पाटील सुनिता कैलास | |
| १४ | शर्मा सुनिला सत्येंद्र | १४ | झिनत रऊफ कुरेशी | |
| १५ | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | १५ | विराणी रेखा अनिल | |
| १६ | पाटील प्रेमनाथ गजानन | १६ | पुजारी कांचना शेखर | |
| १७ | सिंग मदन उदितनारायण | १७ | पिसाळ मनिषा नामदेव | |
| १८ | कांगणे यशवंत ठकाजी | १८ | डिसा मर्लिन मर्विन | |
| १९ | अनिल बाबुराव भोसले | १९ | अनिता जयवंत पाटील | |
| २० | कासोदरीया अश्विन श्यामजी | २० | गोविंद हेलन जॉर्जी | |
| २१ | जैन दिनेश तेजराज | २१ | काझी रशीदा जमील | |
| २२ | जैन रमेश धरमचंद | २२ | इनामदार जुबेर | |
| २३ | डॉ. राजेंद्र जैन | २३ | वेतोसकर राजेश शंकर | |
| २४ | निलम हरिश्चंद्र ढवण | २४ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | |
| २५ | तारा विनायक घरत | २५ | रकवी सुहास माधवराव | |
| २६ | जयमाला किशोर पाटील | २६ | पांडे हंसुकुमार कमलकुमार | |
| २७ | परमार अनिता भरत | २७ | खण्डेलवाल सुरेश | |
| २८ | पाटील प्रणाली संदिप | २८ | वेंचर गिल्बर्ट मेन्डोंसा | |
| २९ | गावंड मंदाकिणी आत्माराम | २९ | मेन्डोसा स्टिवन जॉन | |
| ३० | संध्या प्रफुल्ल पाटील | ३० | डॉ. आसिफ शेख | |
| ३१ | म्हात्रे प्रभाकर पद्माकर | ३१ | नरेश तुकाराम पाटील | |

माहिती अधिकार २००५ अंतर्गत
देण्यात आलेली माहिती सत्यप्रत

जन माहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

| | | | |
|---|---|---|---|
| ३२ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | ३२ | भोईर कमलेश यशवंत |
| ३३ | हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर | ३३ | रविंद्र भिमदेव माळी |
| ३४ | प्रविण मोरेश्वर पाटील | ३४ | वंदना मंगेश पाटील |
| ३५ | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | ३५ | अशोक तिवारी |
| ३६ | केळुसकर प्रशांत नारायण | | |
| ३७ | भोईर भावना राजू | | |
| ३८ | भोईर राजू यशवंत | | |
| ३९ | जाधव मोहन महादेव | | |
| ४० | मुन्ना सिंग | | |
| ४१ | मयेकर सरस्वती रजनीकांत | | |

ठराव बहुमताने मंजुर.

माहिती अधिकार २००५ अंतर्गत
देण्यात आलेली माहिती सत्यप्रत

जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

प्रशासकीय ठराव दिनांक 13 ऑक्टोबर 2022 रोजी दुपारी ३.०० वाजता.

**विषय क्र. (६१) :-** मा. आयुक्त महोदयाकडील कामकाज

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध विकास कामे "एकत्रिकृत विकास निमंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) मधील तरतूदीनुसार विकास हक्क प्रमाणपत्राच्या मोबदल्यात करुन घेणेस मान्यता देणे.

**कार्यालयीन प्रस्तावना**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील खालील कामांचे नकाशे नगररचना विभागामार्फत मंजूर करण्यात आलेले आहेत.

1) मौजे महाजनवाडी सि.सं न/सर्व्हे क्र./हिस्सा क्र.13/1 (92 पै) 6 (85)/5 पै या नागरीसुविधा क्षेत्र भूखंडावर मराठाभवन इमारत बांधणे.
2) मौजे घोडबंदर येथील स.क्र.132/3, 133/4 पै, 5 पै, 6 पै, 7 पै, 8 पै, 148/2 पै या नागरीसुविधा क्षेत्र भूखंडावर महानगरपालिका भवन इमारत बांधणे.
3) मौजे नवघर येथील सर्व्हे क्र.390/3,4,5, 392/1,2, 393/1 व 452/3 या आरक्षण क्र.302 (म्यूनिसिपल हॉस्पीटल) च्या जमिनीवर समावेशक तरतूदीच्या आरक्षणाच्या तरतूदीमधून 'म्यूनिसिपल हॉस्पीटल' इमारत बांधणे.

वरील इमारती संबधित जागा मालक/विकासक यांच्याकडून विकास हक्क प्रमाणपत्राच्या मोबदल्यात करुन घ्यावयाची आहेत. सदर कामांसाठी महानगरपालिकेच्या पॅनल वरील तांत्रिक सल्लागार/ वास्तूविशारदाकडून अंदाजपत्रके प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून काम सोपवून अंदाजपत्रके तयार करुन घेऊन कामांची अंमलबजावणी करण्यात येईल. तसेच विकासक/जागा मालकास केलेल्या कामांचे मुल्यांकन करुन मोबदला देण्यासाठी नगररचना विभागाकडे प्रस्ताव वेळोवेळी सादर करण्यात येईल. वरील सदर कामांच्या प्रशासकीय ठरावाव्दारे मान्यता देण्याचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. ६२ दिनांक 13/10/2022**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध विकास कामे "एकत्रिकृत विकास निमंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) मधील तरतूदीनुसार विकास हक्क प्रमाणपत्राच्या मोबदल्यात करुन घेणेस मान्यता देणे कामाच्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: कलम 452 (अ) च्या (1अ) व (1ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक :- एमसीओ 2020/प्र.क्र.71 (भाग-2)/नवि-14 दिनांक 26 ऑगस्ट 2022 अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, दिलीप ढोले, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका मा.महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन प्रशासनाने सादर केल्यानुसार मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील खालील विविध विकास कामे "एकत्रिकृत विकास निमंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) मधील तरतूदीनुसार विकास हक्क प्रमाणपत्राच्या मोबदल्यात करुन घेणेस प्रशासकीय ठरावाव्दारे मान्यता देत आहे.

1) मौजे महाजनवाडी सि.सं न/सर्व्हे क्र./हिस्सा क्र.13/1 (92 पै) 6 (85)/5 पै या नागरीसुविधा क्षेत्र भूखंडावर मराठाभवन इमारत बांधणे.
2) मौजे घोडबंदर येथील स.क्र.132/3, 133/4 पै, 5 पै, 6 पै, 7 पै, 8 पै, 148/2 पै या नागरीसुविधा क्षेत्र भूखंडावर महानगरपालिका भवन इमारत बांधणे.

माहिती अधिकार २००५ अंतर्गत
देण्यात आलेली माहिती सत्यप्रत

जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

3) मौजे नवघर येथील सर्व्हे क्र.390/3,4,5, 392/1,2, 393/1 व 452/3 या आरक्षण क्र.302 (म्यूनिसिपल हॉस्पीटल) च्या जमिनीवर समावेशक तरतूदीच्या आरक्षणाच्या तरतूदीमधून 'म्यूनिसिपल हॉस्पीटल' इमारत बांधणे.

वरील कामाबाबतची पुढील कार्यवाही नियमानुसार संबंधित विभागाने विहित पध्दतीने करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(दिलीप ढोले)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत बांधकाम विभागाकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना

PC-7/22-23/DK/ST - 4

माहिती अधिकार २००५ अंतर्गत
दे... आलेली माहिती सत्यप्रत

माहिती अधि...
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका